केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत कोकण मंडळास निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृहनिर्माण विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांकः प्रआयो .२०१७/प्र.क्र.४०/गृनिधो-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: ३० मार्च, २०१७

वाचा :-

1) **केंद्र शासनाचे क्रमांक : I-१४०११/१५/२०१६-HFA-४ (FTS-१५२५५), दिनांक २९.०९.२०१६ चे पत्र**
2) **उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्र.मुअ-२/उमुअ/काअ-१/प्रआयो/प्रा./ नस्ती क्र.७२/३६८/१७, दिनांक२४.०३.२०१७ चे पत्र**
3) **समक्रमांक दिनांक २७.०३.२०१७ चा शासन निर्णय**
4) **समक्रमांक दिनांक २७.०३.२०१७ चे शुध्दीपत्रक**

प्रस्तावना :-

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या कोटी निधीपैकी कोकण मंडळाने मागणी केलेल्या एकूण २७४९६ घरकुलांकरिता रु.१६४.९७६ कोटी निधी राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती यांनी नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून सकाणु अभिकरणास (म्हाडा) निधी वितरीत करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे, असे नमूद करुन संदर्भाधीन क्रमांक ४ अन्वये शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

शासन शुध्दीपत्रक

सदर देयक अधिदान व लेखा कार्यालयास सादर केले असता, त्यांनी घेतलेल्या आक्षेपानुसार शासन निर्णयात खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

1) उपरोक्त निधी वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांच्या स्वाक्षरीने व अवर सचिव (गृनिधो-२) यांच्या प्रतिस्वाक्षरीने आणि अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून आहरित करण्यात यावा.
2) सदर निधी वित्त विभागाच्या दिनांक २०.०४.२०१६ च्या परिपत्रकातील परिच्छेद-१८ मधील सुचनांनुसार राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाला असल्याचे कार्यासन (अर्थोपाय) यांनी त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३५/अर्थोपाय, दिनांक २४.१०.२०१६ अन्वये कळविले आहे.

३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : अर्थसं-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३, दिनांक २० एप्रिल २०१६ मधील परिच्छेद क्र.६ व१८ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०३३०१०५६३६४९०९ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sarjerao Shankar Jagdale

Digitally signed by Sarjerao Shankar Jagdale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sarjerao Shankar Jagdale
Date: 2017.03.30 10:58:07 +05'30'

(स.शं.जगदाळे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन (पत्राने),
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२
४. मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
८. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
९. प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र ½ (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३ कार्यासन) मंत्रालय, मुंबई-३२
१२.सह सचिव, भारत सरकार, गृहनिर्माण व शहरी दारिद्रय निर्मुलन मंत्रालय, नवि दिल्ली-११००११ (नोंदणीकृत डाकेने)
१३.सह संचालक, लेखा व कोषागरे, कॅम्पुटर सेल, नविन प्रशासन भवन, ५ वा मजला, मंत्रालय समोर, मुंबई-३२
१४. मुख्याधिकारी, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, मुंबई-५१
१५.निवडनस्ती, गृहनिर्माण विभाग, गृनिधो-२